International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# संत गाडगे बाबा यांचे कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन

**डॉ. संदीप मनोहरराव राऊत**
*इतिहास विभाग प्रमुख,*
*भारतीय महाविद्यालय मोर्शी, जि. अमरावती*
*Corresponding Author – डॉ. संदीप मनोहरराव राऊत*
**DOI - 10.5281/zenodo.15250579**

संतांनी समाजप्रबोधनाकरीता व लोक शिक्षणाच्या प्रचार व प्रसाराकरीता एक प्रभावी माध्यम म्हणून कीर्तन या प्रकारचा उपयोग केला आहे. समाजात सदाचरणी वृत्ती वाढवावी, सुनीती मार्गाने सर्वांनी वाटचाल करावी, आदर्श जीवनाचे संस्कार करावे, यासाठी कीर्तनाची नितांत आवश्यकता वाटते. ईश्वर भक्ती आणि चरित्र संपन्नता या दोन प्रमुख उद्दिष्टांसाठी कीर्तनसंस्था पूर्णपणे राबली. कीर्तनाचे विविध संप्रदाय आहेत. संप्रदाय भिन्न असले, पद्धती भिन्न असल्या तरी सर्वांचं उद्दिष्ट एकच आणि ते म्हणजे सदाचाराचा प्रचार मनोरंजनासह करणे, हे होय! श्रीमंत भगवानराव प्रतिनिधी म्हणतात, "कीर्तन कशासाठी? समाजातील स्त्री-पुरूष सुधारणेसाठी ! आपला समाज, आपले राष्ट्र पुढे जाणे, त्याला आर्थिक, औद्योगिक, कृषिकर्म विषयक आणि राजकीय स्वातंत्र्य मिळावे, खऱ्या धर्माचा प्रसार तरूण पिढीमध्ये व्हावा, यासाठी कीर्तन आहे. कीर्तन ही जनता जनार्दनाची सेवा आहे. अज्ञानांना ज्ञानी करून राष्ट्रकार्य करावे यासाठी कीर्तन आहे." (दादर कीर्तन संम्मेलन ८ व ९ जुन १९२४, अध्यक्षीय भाषण). असे कीर्तनाचे महत्त्व आहे. लोकजागृती आणि लोकशिक्षण करण्यासाठी कीर्तन हा पारंपरिक प्रकार आहे. बाबांनी आपल्या कार्याच्या व विचारांच्या प्रचाराकरीता कीर्तन या प्रभावी माध्यमाचा उपयोग केला. गाडगेबाबांनी समाजातील मागासलेल्या व दुर्बल घटकांमध्ये असलेले दोष दूर करण्याचा प्रयत्न वा मागनि केला. त्यांचा संपूर्ण उपदेश हा वस्तुस्थितीवर आधारल होता. सर्वसामान्य व दुर्बल समाजाच्या देवाविषयीच्या भोळसर कल्पना, जन्म, मृत्यू, मोक्ष वा विषयीच्या निराधार कल्पना, अंधश्रद्धा, आकलन न झालेल्या आध्यात्मिक कल्पना त्यांच्यामध्ये निर्माण होऊन त्यामुळे त्यांचे अधःपतन होऊन समाजात विकृती निर्माण झाली होती. अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रद्धा यामुळे स्वतंत्र विचार करण्याची शक्ती तर्कशुद्ध रितीने निर्णय घेण्याची क्षमता गंजून गेली होती. अशा या समाजाच्या विचारशक्ती नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न बाबांनी कीर्तनाच्या माध्यमातून केला आहे.

संत गाडगेबाबांची कीर्तन पद्धती ही वारकरी संप्रदायातील असली तरी यामध्ये मात्र वेगळी वैशिष्टये दिसून येतात. गाडगेबाबांचा संप्रदाय महाराष्ट्रात सर्वदूर पसरला आहे. वारकरी कीर्तनकारास विशिष्ट पोषाख असला पाहिजे असा अलिखित नियम आहे. वारकरी कीर्तनात फेटा आवश्यक आहे. पगडी नाही. अंगावर उपरणे, लांब बाह्यांचा पांढरा सदरा, पांढरे धोतर अनिवार्य. मोगऱ्याच्या फुलासारखा पांढरा स्वच्छ पोषाख आणि टाळकऱ्यांनी पांढरी टोपी घातली पाहिजे असा नियम आहे. परंतु गाडगेबाबांनी आणि त्यांच्या टाळकऱ्यांनी असा नियम पाळल्याचे आढळून येत नाही. वारकरी कीर्तन करणारे बुवा कीर्तनास उभे राहण्यापूर्वी वारकरी भजने म्हणतात, बुवा कीर्तनाच्या गादीवर स्थानापन्न होईपर्यंत विविध संताचे अभंग

विणेकरी पुढे उभा राहून सांगतो व टाळकरी एक-एक ओळ लावून म्हणतात. सोबत मृदंग साथ देतो. भजनी वारकऱ्यापैकी एक वारकरी मुख्य विणा घेऊन टाळकऱ्यांच्या मधोमध पण रांगेच्या पुढे उभा असतो. बुवाच्या डाव्याबाजूला काही अंतरावर पखवाजी असतो. अभंग व भजन म्हणण्याचा आनंद सुरू असतो. बुवा कीर्तनासाठी आल्याचे समजताच टाळकरी व विणेकारी 'विठोबा रूखमाई'ची धून सुरू करतात. भजन चालू असताना बुवा कीर्तनकार गादीवर विराजमान होतात. विणेकऱ्यास व श्रोत्यास वंदन करून वीणा आपल्या गळ्यात घालतात. पुन्हा 'जय जय रामकृष्ण हरी' या भजनाचा आरंभ होऊन काही मिनीटे नुसते बुवा भजन सांगतात व श्रोते टाळ्या वाजवून म्हणतात. अशा प्रकारे सुमारे पाच दहा मिनीटापर्यंत भजन अगदी वेगाने टाळ्यांच्या गजरात सुरू असते. बुवा मध्ये होऽऽऽ म्हणतात बुवा नमनाचा ज्ञानेश्वराचा अभंग म्हणतात.

**"रूप पाहता लोचनी सुख झालेहो साजनी**
**तोहा विठ्ठल बरवा, तोहा माधव बरवा ।।"**

ही वारकरी संप्रदायाची पद्धत आहे.

पण बाबांची कीर्तनपद्धती मात्र भिन्न स्वरूपाची होती. गाडगेबाबा कीर्तनास बेण्यापूर्वी भजन सुरू होत असे. बाबांचे दहापंधरा शिष्य भजनी गडी, त्यांची वस्त्र प्रावणे ही जगावेगळी होती. डोक्यावर वाढलेले अस्ताव्यस्त केस, कुणाच्या अंगात तांबड्या शालीचं कुंडतं, कुणी उघडाबंब, तुळशीमाळ प्रत्येकाच्या गळ्यात. गाडगेबाबांच्या संप्रदायाची खूण म्हणून पट्ट्यापट्ट्याच्या घोंगडीचा एक तुकडा. बाबांच्या आगमनापूर्वी भजन चालू असे. बाबा येताच भजन थांबत असे. सगळ्यांकडे पाहून बाबा हात जोडत असत आणि मग कानावर हात ठेवून अभंग म्हणावयास प्रारंभ करीत असत. यात तुकोबांच्या अभंगाचा समावेश असे. अभंगाची चाल सोपी व धावती असे. अभंग म्हणून झाल्यानंतर बाबांचे भजन सुरू होई. 'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला' किंवा 'राम राम सीताराम' हे भजन सर्वांसह म्हणायचे. भजन संपताच ऐकणारे पुंडलिक वरदे हरी विठ्ठल असा जयघोष करत. त्यानंतर निरूपणास प्रारंभ होई. बाबा वऱ्हाडचे असल्याने त्यांच्या बोलीवर वहऱ्हाडी भाषेचे संस्कार झालेले आहेत. त्या वहऱ्हाडी भाषेत बाबांचे कीर्तन होई "तुकाराम महाराज मन्तत' असा कीर्तनाचा प्रारंभ होता. जनांच्या करूणेने भिजून गेलेले बाबा प्रसादवाणीने बोलत. कधी ते जनाच्या गावंढळपणावर चिडत होते. दोषावर आसूडाचे फटकारे ओढीत असत, कधी विवेचनातून थट्टा करीत होते. कधी पोटाशी धरीत होते. आपल्या कीर्तनातून जणू ते श्रोत्यांच्या काळजाला हात घालीत होते. बाबांची बोली जरी वऱ्हाडी होती, तरी कीर्तनात जमलेली माणसे ही कोकणातील असो की मराठवाड्यातील, पण भाषा ही संवादात अडचण ठरत नव्हती कारण ते उमजेल असेच बोलत होते.

कीर्तनात समाजाचा बरोबर सहभाग मिळविण्याचा हा प्रकार एका दृष्टीने पूरातनच आहे. समाजाला आपल्या बरोबर भजन गायला लावण्याची पद्धत श्री तुकारामादी संतांनी अवलंबली होतीच. परंतु प्रश्नोत्तर पद्धतीचा कीर्तनात नव्याने समावेश केला तो श्री संत गाडगेबाबांनीच. बाबा आपल्या कीर्तनात पदोपदी प्रश्न निर्माण करीत व त्यांची उत्तरे समाजाकडून मिळविण्याचा प्रयत्न करीत, ही त्यांच्या कीर्तनाची अभिनव पद्धत होती. त्यामुळे कीर्तनात समाजाचा सहभाग वाढून त्यात समाज एकरूप होत असे. सॉक्रेटिस सारखे प्रश्नोत्तरे ते जनसामान्यास विचारीत असत. बाबा जनतेला प्रश्न विचारून त्यांचे अवधान टिकविण्याचा प्रयत्न करीत असत. लोकांना त्यांच्या जीवनासंबंधी, जगण्यासंबंधी, त्यांच्या परिस्थितीसंबंधी प्रश्न विचारून त्यांच्याकडून त्यांची उत्तरे मिळवीत होते. त्यामुळे समाजाची विचारशक्ती जागृत होऊन त्यांना विचार करावयास भाग पाडत होते.या प्रश्नांची उत्तरे देताना सामुहिक आवाज दुमदूमत असे. समाज कायम क्रियाशील व्हावा हा यामागील खरा उद्देश होता. शिक्षण म्हणजे स्वत्वाची रा स्वतःच्या स्थितीचे स्वत:जवळ असणाऱ्या सकारात्मक व नकारात्मक बा जाणीव होणे. स्वतःतील गुण, दोष आणि शक्ती स्थळे लक्षात घेऊन, आहे परिस्थितीमध्ये सकारात्मक बदल

घडविण्यासाठी प्रयत्नशील असणे. ही अमि जाणीव बाबा लोकांना करून देत. बाबा लोकांकडूनच त्यांच्या दुःखाची कारणे त्यां समजावून देत व त्यावरील उपाय त्यांच्याशी कीर्तनातून संवाद साधून करून देर त्यामुळे समुहमनामध्ये अस्मिता व स्वत्वाची जाणीव निर्माण होई. अस्मितेची जाणीव झालेला माणूस आपली निश्चितच प्रगती करणार. जनतेने स्वतःचा विकास करावा, यासाठी बाबाचा हा प्रयास होता. कीर्तनातील प्रबोधनाचा उद्देशही हाच होता की, समाजाला समाजाच्या दुःखाची आणि स्थितीची जाणीव व्हावी आणि या जाणिवेत्न तो स्वतःचा विकास करेल. बाबांचे बोलणे साधे, त्यांचे विषय ग्रामीण जीवनातले, त्यामुळे श्रोत्यांच्या बुद्धीला अर्थग्रहणाचे श्रम पडत नसत. बाबांच्या विनोदी भाषेमुळे नि चुटकुल्यामुळे सारखी खसखस पिकत होती. बाबांचे कीर्तन हे हृदयाची पकड़ घेणारे होते. शेतकरी, घुमक्या, फेरीवाला, अडाणी बाया, दारूडे इत्यादीच्या अभिनयातून नि त्यांचे हेल काढून बाबा सहज व्यक्तिरेखा साकरित होते. मेघगर्जन सारखा भरदार आवाज, तर कधी स्वरमुलायम, तर कधी धारदार, कधी मातेची ममता, करूणा तर कधी शब्दांचे जबरदस्त फटके, हितचिंतक अशा आपल्या वडिलधाऱ्या पुरूषाने जिव्हाळ्याने आपल्याशी हितगूज करावी. तशी हृदयसंवाद साधणारी शैली. यामुळे लोकांना वाईट गोष्टींचा पश्चाताप होई व सद्गुणांचे संकल्प बळावू लागत.

बाबांनी १९०७ पासून ऋणमोचन येथून आपल्या कीर्तनाला प्रारंभ केला. त्यांच्या कीर्तनाचे विषय कोणते? काय आढळते त्यांच्या कीर्तनात ? ब्रह्म-माया, सगुण-निर्गुण, दृश्य-अदृश्य, स्वर्ग-नरक, मुर्तिपूजा, कर्मकांड, यज्ञयाग यापैकी काहीही नाही. इथे आढळतो खरा व्यवहार, खरा देव, खरी पूजा ! इथे आढळते मद्यपान निषेध, भूतदया, दीन दुबळयांची सेवा ! इथे आढळते अंधश्रद्धेवर प्रहार, शिवाशिवीचा तिरस्कार आणि व्यवहार साधून परमार्थ साध्याची कला ! गाडगेबाबांनी पिढ्यान्पढ्या अज्ञानाच्या अंधकारात चाचपडणाऱ्या, पूरत्या गरिबीने खचून गेलेल्या, साऱ्या व्यसनामुळे शरीर खंगून गेलेल्या, कर्जभाराने कंगाल झालेल्या, अंधश्रद्धेमुळे दिशाहिन प्रवास करणाऱ्या, भुकेने व्याकुळ झालेल्या हजारो लोकांना सन्मार्गाला लावले."

गाडगेबाबांचे कीर्तन ऐकणे हा हृदय अनुभव होता. तो ऐकण्यासाठी लोकांचे थवेच्या थवे कीर्तनाच्या दिशेने जात असे. रस्त्यावर कुठे तरी एका कोपऱ्यावर एखाद्या लहानसहान कागदावर किंवा लाकडाच्या फळीवर वेड्यावाकड्या अक्षरात लिहिलेले असते. "आज रात्री गाडगे महाराज यांचे कीर्तन येथे आहे." दिवसभर हजारो लोक तेथून चाललेले असतात, कोणी त्या मजकूराकडे बघतही नाही. कोणी वाचतही नाही. पण संध्याकाळ झाली, अंधार पडला की, त्या ठिकाणी हजारो निरक्षर आणि अडाणी गरीब लोक गुपचूप जमा झालेले दृष्टिस पडतात. पंधरा हजारापासून तर पन्नास हजारापर्यंत गर्दीचा विस्तार असतो. गुळाचा खडा रस्त्यावर पडला म्हणजे जशा हजारो मुंग्या आपोआप गोळा होतात. तसेच गाडगेबाबांचे कीर्तन असले की समाजातल्या शूद्र आणि कष्टकरी मुंग्या आपोआप गोळा होतात तसेच महाराष्ट्रातले हजारो कंगाल, भुके-कंगाला, रोगी महारोगी, स्वहिताच्या लाभासाठी गाडगेबाबांची कथा असली म्हणजे देहभान विसरून धावत सुटतात. यावरून जनतेचे बाबांवर असलेले प्रेम व्यक्त होते. बाबा त्या अज्ञान निरक्षर लोकांना सहज समजेल अशा बाळबोध भाषेत जनतेच्या अंतःकरणाचा ठाव घेऊन त्यांना नित्य व्यवहारातले दाखले ते आपल्या कीर्तनातून देत असत. दांडेकर म्हणतात, "त्यांच्या कीर्तनात साथ असली-नसली तरी केवळ दोन दगडही त्यांच्या टाळाचे काम करीत होते. त्यांनी समाजातील सुख दुःखांना महत्त्व दिले. त्यांच्या जीवनातले प्रश्न बाबांनी आपल्या कीर्तनातून मांडले. त्यांची वाणी आणि मांडणी अशा प्रकारची होती की, श्रोत्यांना तासन्तास खिळवून ठेवण्याचे सामर्थ त्यात होते." आचार्य अत्रे म्हणतात, "त्यांचे सामर्थ्य तुम्हाला एरवी मुळीच कळणार नाही. 'सिंहाला पाहावे वनात,

हत्तीला पहावे रानात तसेच गाडगेबाबांना पाहावे कीर्तनात !' हजारो माणसाच्या प्रचंड जनसमुदायामध्ये बाबा एकदा उभे राहिले म्हणजे पावसाळ्यातल्या मेघासारखे आभाळ गडगडू लागतात आणि डोक्यावर साहित्य, सद्भावनेचा आणि सद्विचारांचा असा काही जबरदस्त मारा सुरू होतो, की श्रोते अक्षरशः त्या कीर्तनाच्या सरोवरात तासन्तास डुबून राहतात. कीर्तनासाठी बाबांना साहित्य लागत नाही. टाळ नको, वीणा नको, बाजाची पेटी नको, मिळेल तरी वाहावा, नाही मिळेल तरी वाहावा रस्त्याचे दगड वेचून ते वाजवायाला लागतात, श्रोत्यांच्या टाळ्या आणि घोष हेच त्यांच्या कीर्तनाचे सारे भांडवल." यावरून आपल्याला बाबांच्या कीर्तनाचे सामर्थ्य व प्रभाव दिसून येतो.

बाबांचे कीर्तन हे परंपरेच्या ठराबिक चाकोरी बाहेरचे होते. नव्या विचारांचे तत्त्वज्ञान बहुजन समाजाच्या गळी उतरविणे फार कठीण कार्य होते ते बाबाती यशस्वी केले. त्यानी समाजाच्या धर्म, देव, रूढी परंपरा, त्याचबरोबर व्यसनमुक्ती, जातीयता बावर कठोर प्रहार केले. बाबा आपल्या कीर्तनातून, देव एक आहे, देव देवळात नाही, तीर्थात नाही, तर तो रंजल्या गांजल्याच्या सेवेत आहे, हे आवर्जुन सांगत असत. बाबा कीर्तनात श्रोत्यांना एकेश्वरवाद म्हणजे ईश्वर एक आहे, हे मोठ्या खुबीने व

**युक्तीने पटवून देत असत. ते श्रोत्यांना विचारीत,**

**बाबा: "बाप्पो हो जगात देव किती ?"**

**श्रोते "एक!"**

**बाबा : "**

देव जर एकच आहे, हे जर खरे असेल तर खोटे बोलायचे नाही हो बाप्पा! आपल्या गावी खंडोबा आहे की नाही? 'आहे' मग आता देव किती झाले ? ' दोन आपल्या गावी भैरोबा आहे काय?' (आहे) आता देव किती झाले ? (तीन) आपल्या गावी म्हसोबा आहे का नाही? (आहे) आता देव किती झाले ? (चार) आपल्या गावी मरीमाय आहे का नाही? (होय, आहे) आता देव किती झाले? (पाच) पहिले, म्हणत व्हात की देव एकच आहे म्हणून! मग हा कारखाना कुठे सापडला? आणि याची वाढ कुठवर लांबणार?" अशा लोकांना तुकोबा म्हणतात, "वेड लागले जगाला, देव म्हणती धोंड्याला!" मेंढरे आहोत आपण, काही ज्ञान नाही, एका तोंडाने म्हणायचे की देवाने आपण सगळ्यांना आणि जगाला निर्माण केले आणि गावोगाव पहावे तर दगडांना शेंदूर फासून हजारो लाखो देव तयार करण्याचा कारखाना आम्ही चालू ठेवलाय. अहो, बाप्पांनो. दगड धोंड्यांना शेंदूर लावून जर त्यांचा देव होत असेल आणि तो नवसालाही पावत असेल, तर मग चांगला मोठा डोंगर पाहून, सपाटेबाज शेंदूर फासून त्याचा टपोरेबाज भलामोठा देव बनविता येईल आणि तो आपले मोठमोठ्याने नवस पण फडश्या पाडीत जाईल, मग काय? कष्ट मेहनत नको, गुरे-ढोर नको, त्या देवापूढे उद्धपाचा एक डोंगर धूपाटला, की आपोआप शेती पिकून तयार होईल. जमेल का असे केले तर? (नाही, नाही, नाही) तर मग हा धंदा लबाडीचा आहे." अशा प्रकारे बाबा श्रोत्यांना देव ही संकल्पना पटवून देत असत.

बाबा आपल्या कीर्तनातून अस्पृश्यतेवर कठोर प्रहार करीत असत. "गोपाला, गोपाला, देवकीनंदन गोपालाच्या भजनात लोक गूंग असताना, होऽऽऽ, "आपल्या हिंदुस्थानाले एक मोठा डाग आहे. तो डाग धुऊन काढायाचा प्रयत्न करा, तो डाग कोणता ? शिवशील ! काय, करशिल? शिवशिल ! शिवशिल ! तू कोण, का पुसता ? कोणी तुम्हाले जात विचारील, तू कोण? तर म्हणाव माणूस. कोण आहात तुम्ही? माणूस। का म्हैस आहात? नाही! कोण आहात? माणूस! कोण, तर म्हणावं 'माणूस'। जात पुसणाऱ्याला शरम नाही वाटत. त्याच्यासारखा तो आहे अन जात पूसते तू कोण ? आपल्या सारखा आहे का काही चूक आहे? नाही! कोण ? नाही! तुमचं आमचं दोन काय आहे, दाखवा! तुमची आमची जमीन एक की दोन ? एक! तुमचं आमचं आकाश एक की दोन? एक SSS! कॉलेरा, पिलेग एक की दोन ? एकऽऽऽ! जेवन-परसाकडे एक की दोन? एक! सूर्यनारायण एक की दोन ? एकऽऽऽ!

आगगाडी एक की दोन ? एक! दाखवा मग म्हणा शिवशिल ! काय दोन आहे? सांगा तुम्ही आम्ही एका रस्त्यातून जन्मलो का? आम्ही आईच्या येवनीतून पडलो अन् तुम्ही काय तोंडातून पडले. का बाहेर का बगलीतून निघाले ? सांगा! माणसाले जाती दोन आहेत. किती? दोन! बाई आणि पुरूष् या दोनच जाती आहे, तिसरी जातच नाही. बाबांनी आपल्या कीर्तनातून अस्पृश्यतेवर प्रहार करत समाजात समता आणि बंधूभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

सुदाम सावरकर म्हणतात, "गाडगेबाबांचे हे कीर्तन म्हणजे लोकजागृती नि लोकशिक्षणाचे रोचक साधन ! सहज विनोद आणि उदात्त जीवन बोध!" तर आचार्य अत्रे म्हणतात, "बाबाचे कीर्तन श्रवण हा एक महान अनुभव आहे. तो ज्याने घेतला नसेल तो करंटा, तो दुर्देवी, तो अभागी ! तो कशाला ह्या महाराष्ट्रात जन्माला आला? आमची पंचावन्न वर्ष आतापर्यंत फुकट गेली होती ती ह्या रात्री सार्थकी लागली आणि जीवन कृतार्थ झाले ! बाबांच्या कीर्तनाचे वर्णन शब्दांनी करता येणार नाही आणि त्यांचे रहस्य मध्यमवर्गीय सुशिक्षिताना आणि पांढरपेशा समाजाला मुळीच कळणार नाही. बाबांचे कीर्तन अज्ञानांसाठी, गरिबांसाठी, दलितांसाठी, दुःखितांसाठी आहे. त्यात योग नाही, अध्यात्म नाही. पोथीपूराण नाही, देवाची वर्णन नाहीत, पूजा, यात्रा याचा उपदेश नाही, त्यात शुद्ध जीवन आहे. हजारो वर्ष सर्व समाज आर्थिक सत्तेखाली आणि धार्मिक रूढीखाली भरडून निघाल्यामुळे दुधखुळ्या, देवभोळ्या अन् आंधळया-पांगळ्या झालेल्या हीनदीन समाजाच्या उद्धाराचा झगझगीत प्रकाशझोत म्हणजे गाडगेबाबाचे कीर्तन." असे वर्णन त्यांनी बाबांच्या कीर्तनाचे केले आहे.

बाबांनी संपूर्ण आयुष्यभर स्वच्छता, शिक्षण आणि स्वावलंबन जनतेत रूजविण्याचा प्रयत्न केला. "बाबांनी ज्ञानदानासाठी वऱ्हाड, नागपूर, छत्तीसगड, महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र, कोकण, गोवा, गोकर्ण, महाबळेश्वर, हुबळी, धारवाड, बेळगाव, कोल्हापूर, निजामाचे राज्य, म्हैसूर संस्थान, बडोदा, इंदोर, धार व देवास, दक्षिणेतील सर्व संस्थाने यातील लहान मोठ्या अशा अनेक गावी कीर्तने केली.

जनसामान्यावर वावांच्या वाणीचा खूप प्रभाव होता. त्यांच्या विचाराला आचाराची, शब्दाला कर्तृत्वाची आणि उपदेशाला तळमळीची जोड होती. त्यामुळे त्यांच्या बोलण्याचा समाजावर खूप परिणाम होत असे. ते समाजाला सोप्या भाषेत, सोप्या शब्दांत तत्त्वज्ञान सांगीत. ते आपले कीर्तनात "कर्ज काढून देवाची यात्रा करूनका, देवाला कोंबडे बकरे कापू नका, मुलाना शिकविल्या बिना राहू नका, आई बाबांची सेवा करा, आंधळ्या पांगळ्यांची सेवा करा, हंडा घेऊन लग्न करू नका,द पिऊ नका, अस्पृश्यता पाळू नका, नवसाने देव पावत नसतो, भुकेलेल्यांना अ कर्ज काढून सण साजरे करू नका, गायी बैलांची चिंता करा, देवाचे भजन करीत असे जनसामान्यांना पचणारे आणि रूचणारे तत्त्वज्ञान बाबा अगदी साध्या सोप्या भाषेत गरीब अज्ञानी दलित लोकांच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न करत. त्यांच्या भाषेबद्दल आणि वक्तृत्वाबद्दल आचार्य अत्रे म्हणतात, "जणू मराठी भाषा त्यांच्या घरी पाणी भरते. तसेच जनतेची भाषा बोलणारा असा प्रभावी आणि जबरदस्त वक्ता दुसरा महाराष्ट्रात नाही."

बाबांच्या कार्याचे प्रमुख साधन म्हणजे कीर्तन! रूढी-परंपरा, अज्ञान, अंधश्रद्धा यांनी ग्रासलेल्या समाजाला जागृत करणे, सुखी करणे, ज्ञानी करणे हा त्यांचा कीर्तन करण्यामागचा प्रमुख हेतू होता. माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे याचे धडे समाजाला ते आपल्या कीर्तनातून योग्य दाखल्यासह देत असत. बाबांनी इतर कीर्तनकाराचे अनुकरण न करता त्यांनी आपली वेगळी वैशिष्टये असलेली कीर्तन पद्धती निर्माण केली. नवे तंत्र अस्तित्वात आणले. आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून समाजाची विदारक वस्तूस्थिती श्रोत्यांसमोर मांडली. त्यातून त्यांनी समाजाला मुक्त करण्याचे प्रयत्न केले. त्यांनी निर्माण केलेली ही कीर्तन शैली व्यापक अनुभूतीचा अविष्कार होता. "बाबांची कीर्तन शैली पाहली कीं त्यांच्या बंडखोर वृत्तीचा प्रत्यय येतो आणि हीच वृत्ती त्यांनी शेवटपर्यंत लोकशिक्षणाची

गुरूकिल्ली म्हणून प्रचारात आणली व तत्कालीन संत परंपरेला तडा दिला. म्हणूनच समाजातील भोंदूगिरी कमी होण्यामागे त्यांच्या कीर्तन शैलीचे मूल्यमापन करावे लागेल."

गाडगेबाबांनी समाजप्रबोधनाकरीता कीर्तन या प्राचीन संस्थेचा उपयोग केला. आपल्या कीर्तनातून श्रोत्यांशी संवाद साधून कीर्तनकार व श्रोते यांचे सहसंबंध निर्माण केले. जनतेला पचेल व रूचेल या भाषेत तत्त्वज्ञान सांगितले. त्यांनी सामाजिक विचारांची नुसती जाणीव करून दिली नाही, तर त्यांनी आपल्या वाणीतून आणि शुद्ध आचरणातून ते नष्ट करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. सामाजिक विकृती, अज्ञान, रूढी, परंपरा, यातून जागे होण्याचा मार्ग दाखविला

**संदर्भग्रंथ सूची :**


१) दांडेकर , गो. नि.,स्मरणगाथा , मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई, २००३

२) सावरकर , सुदाम , तापोमुर्ती श्री गाडगेबाबा (जीवन व कार्य) , साहित्यप्रभा प्रकाशन, अमरावती १९८१ .

३) कडवे, रघुनाथ, वैराग्यमूर्ती गाडगेबाबा , संस्कार प्रकाशन, नागपूर, १९९६

४) भगत,रा. तू., गाडगे बाबांची काठी , चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, २००३.

५) अत्रे, आचार्य, मराठी माणसे आणि मराठी मने,प्रकाशन मंदिर मुंबई , १९५६.

६) दांडेकर , गो. नि.,श्री गाडगे महाराज , मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई,२०००.

७) ठाकरे,के. सी.,श्री गाडगेबाबा , श्री गाडगे महाराज प्रकाशन, मुंबई १९९८.

८) कवडे, पाडुरंग, श्री संत गाडगे महाराज उर्फ गोदडे महाराज चरित्र, श्री गाडगे महाराज प्रकाशन, मुंबई २००० .

९) लोकराज्य मासिक मुबई , गाडगेबाबा जन्मशताब्दी विशेषांक, १९७७.